# जिव्हाजी सहकारी बँक लि; इचलकरंजी.

## सेफ डिपॉझिट लॉकर मागणी अर्ज

खाते नं. लॉकर नं. किल्ली क्रं.

प्रति,

मा. मुख्यकार्यकारी अधिकारी / शाखाधिकारी

जिव्हाजी सहकारी बँक लि; इचलकरंजी.

अर्जदाराचे नांव .................................................... वय

.................................................... वय

पत्ता ....................................................

व्यवसाय .................... E-mail-ID :

फोटो

फोटो

महाशय,

मी/ आम्ही आपल्या सेफ डिपॉझट लॉकर मधील वर्ग लहान/मध्यम/मोठा लॉकर भाड्याने घेवू इच्छितो. सदरचा लॉकर मला / आम्हांस वर्षे या मुदतीसाठी मिळावा. यासाठी बँकेने ठरविलेले लॉकर कि डिपॉझिट/ वार्षिक भाडे मी / आम्ही आगाऊ भरत आहे./ आहोत. बँकेचे याबाबतचे नियम अटी मी /आम्ही वाचल्या असून त्या मला /आम्हास मान्य आहे./आहोत. बँकेत लॉकर संबंधी सेव्हिंग खाते उघडले आहे. लॉकर उघडणे /वापरणेचा अधिकार मी किंवा आमच्या वतीने खालील व्यक्तींना अधिकार देत आहे/आहोत. ते खालील नमुन्या प्रमाणे सही करतील व त्यांनी लॉकर संबंधी केलेले सर्व व्यवहार माझे /आमचेवर बंधनकारक राहतील.

नांव .................................................... मो. नं.

नांव .................................................... मो. नं.

अधिकार दिले व्यक्तीचे नांव .................................................... वय

पत्ता .................................................... मो. नं.

---

BRACT 1949-S-56/45 Z E प्रमाणे

## नामनिर्देशन एस. एल.१ अे

CO-OP BANK R 1985 / 4 (2) प्रमाणे

आमच्यापैकी एकाचा अथवा अनेकाचा मृत्यू झाल्यास सदर बँकेतील सेफ डिपॉझिट लॉकर आमच्यापैकी जे हयात असतील व नेमूण दिलेला वारस यांचे बरोबर संयुक्तपणे / स्वतंत्रपणे लॉकर उघडणे व त्यातील ठेवलेल्या चीज वस्तू घेण्यासाठी /हलविण्यासाठी माझे तर्फे वारस म्हणून

मी श्री./सौ. .................................................... यांना राहील.

पत्ता .................................................... वय नाते ....................

व्यवसाय .................................................... मो. नं.

वरील मागणी अर्जात दिलेली माहिती, नेमूण दिलेला वारस व लॉकर व्यवहारासंबंधी दिलेल्या अधिकार व्यक्तीची सही खरी व बरोबर आहे. तरी माझे /आमचे वरील मागणी अर्जानुसार आपले बँकेकडील सेफ डिपॉझिट लॉकर भाड्याने मिळावा हि विनंती.

दि. / / अर्जदाराची सही अर्जदाराची सही

---

## ऑफिस माहिती

लॉकर वर्ग : लहान /मध्यम /मोठा लॉकर क्रं : किल्ली क्रं.

सुरक्षा ठेव पावती क्रमांक ठेव रक्कम मुदत दिनांक / /

ग्राहक क्रं. चालू /बचत ठेव क्रं. सांकेतिक शब्द

बँकेच्या नियमाप्रमाणे अर्जदार श्री. .................................................... यांना

वर निर्देशित लॉकर तपशिलाप्रमाणे वार्षिक भाड्याने / सिक्युरिटी ठेवने मंजूर करण्यात आलेले आहे

क्लार्क ज्यु. ऑफिसर / शाखाअधिकारी मुख्यकार्यकारी अधिकारी

**जिव्हाजी सहकारी बँक लि; इचलकरंजी** यांचे कडून माझे /आमचे लॉकर मागणी अर्जाप्रमाणे लॉकर लहान/मध्यम/मोठा लॉकर क्रमांक चा लॉकर बँकेने मला /आम्हांला वार्षिक भाड्याने /सिक्युरिटी ठेवणे वापरणेस दिला. त्याची किल्ली क्रं. मिळाली. बँकेचे यासंबंधातील नियम व अटी मला/आम्हाला मान्य आहेत. याबाबतचा करारपत्रात उल्लेख केले प्रमाणे ही पोहोच दिली आहे. आमचा या व्यवहाराबाबत सांकेतिक शब्द हा आहे.

दि. / /

**लॉकर धारकाची सही**

---

**प्रति,**

**मा. मुख्यकार्यकारी अधिकारी / शाखाधिकारी जिव्हाजी सहकारी बँक लि; इचलकरंजी यांना,**

महाशय,

मी / आम्ही खाली सही करणार आपल्या बँकेच्या लॉकरमधील लहान/मध्यम/मोठा वर्ग क्रं. हा वर्षे मुदतीने भाड्याने घेतला असून त्याची मुदत संपते /संपली आहे. सदर लॉकरचे पुढील नुतनीकरण करतेवेळी बँकेचे अस्तित्वात असलेले नियम, लॉकर भाडे व सिक्युरिटी ठेव मला मान्य आहे.

| नुतनीकरणाचा कालावधी | लॉकर भाडे | ठेव रक्कम | पावती क्रमांक | शाखाधिकारी सही | लॉकरधारक सही |
|---|---|---|---|---|---|
| दि. / / ते<br>दि. / / पर्यंत | | | | | |
| दि. / / ते<br>दि. / / पर्यंत | | | | | |
| दि. / / ते<br>दि. / / पर्यंत | | | | | |

## लॉकर व किल्ली ताबा

**प्रति,**

**मा. मुख्यकार्यकारी अधिकारी / शाखाधिकारी, जिव्हाजी सहकारी बँक लि; इचलकरंजी यांना,**

महाशय,

मी / आम्ही खाली सही करणार आपल्या बँकेच्या लॉकरमधील लहान/मध्यम/मोठा वर्ग क्रं. हा वर्षे मुदतीने भाड्याने घेतला असून त्याची मुदत दि. / / संपते / संपली आहे. /यापुढे मला / आम्हांला लॉकर भाड्याने ठेवायचे नसल्यामुळे त्यामधील माझ्या / आमच्या सर्व चीज वस्तू व जिन्नस मी / आम्ही आजरोजी काढून घेतल्या असून तो पुर्णपणे मोकळा करुन बँकेच्या ताब्यात किल्लीसह दिला आहे. याबाबत माझी / आमची काही तक्रार नाही.

दि. / /

**लॉकर धारकाची सही**

---

**प्रति,**

**मा. मुख्यकार्यकारी अधिकारी / शाखाधिकारी, जिव्हाजी सहकारी बँक लि; इचलकरंजी यांना,**

महाशय,

माझे / आमचे आपल्या बँकेच्या लॉकरमधील लहान/मध्यम/मोठा वर्ग क्रं. किल्ली नं. ही आहे. लॉकरची किल्ली माझ्या / आमच्याकडून गहाळ झाली आहे. कृपया लॉकर ब्रेक ओपन करावे त्यासाठी येणारा खर्च मी / आम्ही देण्यास तयार आहे /आहोत.

दि. / /

**लॉकरधारक सही**

वरील लॉकर माझ्या समक्ष ब्रेक ओपन करण्यात आला असून त्या लॉकर मधील सर्व चीज वस्तू व जिन्नस मी/ आम्ही काढून घेतल्या आहेत. लॉकर पुर्णपणे मोकळे करुन बँकेच्या ताब्यात दिले आहे. त्याबाबत माझी /आमची काहीही तक्रार राहिलेली नाही

दि. / /

**लॉकरधारक सही**

---

वरील अर्जदाराने सेफ डिपॉझिट लॉकरमधील लहान/मध्यम/मोठा वर्ग क्रं. रिकामा करुन दिला असून त्यांनी त्याची किल्ली नं. आजरोजी बँकेस परत दिली आहे. सदर लॉकरधारकाकडे या लॉकर संदर्भात काही येणे राहीलेले नाही.

दि. / /

**क्लार्क** **ज्यु. ऑफिसर / शाखाधिकारी**

# जिव्हाजी सहकारी बँक लि, इचलकरंजी.

## सेफ डिपॉझिट लॉकर भाडे करार / करारनामा

प्रति,
मा. मुख्यकार्यकारी अधिकारी / शाखाधिकारी जिव्हाजी सहकारी बँक लि; इचलकरंजी यांना,

मी/आम्ही खाली सही करणार भाडे करार / करारनामा लिहून देतो कि,

श्री./सौ. ________________________________ वय

पत्ता ________________________________ व्यवसाय ______________

आपल्या बँकेच्या सेफ डिपॉझिट लॉकर मधील आम्हास लहान/मध्यम/मोठा वर्गाची सेफ डिपॉझिट लॉकर नं. भाड्याने वापरण्यास देण्याचे कबूल केल्यावरुन आम्ही आपणास भाडे करार/ करारनामा लिहून देत आहोत. तो असा कि,

१) आज रोजी सेफ डिपॉझिट लहान/मध्यम/मोठा वर्गामधील लॉकर नं. वापरण्याकरिता प्रत्यक्ष रितीने आम्हास या करारनाम्यान्वये आपण दिली व आम्ही ती घेतली आहे. त्या लॉकर मध्ये आम्हीकोणत्याही प्रकारची स्फोटक द्रव्ये अथवा तत्सम उपद्रवी वस्तू अथवा प्रतिबंधक वस्तू ठेवणार नाही. याचा संशय बँकेच्या व्यक्तीस आल्यास त्याप्रमाणे बँक ठरवेल त्या वेळेवर आम्ही स्वत: अगर अधिकार दिलेली व्यक्ती यांना लॉकर उघडता येईल याची हमी देत आहोत.

२) मला/आम्हाला मिळालेल्या लॉकरच्या किल्लीपोटी 'कि सेक्युरिटी डिपॉझिट' म्हणून रक्कम रुपये
(अक्षरी रु. ) बँकेकडे जमा केली आहे. सदरचे डिपॉझिटवर व्याज मिळणार नाही. तसेच लॉकरसाठी बँक भाडेही आकारणार नाही. या डिपॉझिटवर कोणत्याही प्रकारे कर्ज देता /घेता येणार नाही याची मला जाणीव आहे. सदरचे लॉकर कि डिपॉझिटची रक्कम माझे लॉकर बंद करतेवेळी मला परत मिळणेची आहे.

३) सदर करारनाम्याची मुदत अखेर राहील. या मुदतीनंतर आम्ही बँकेचा लॉकर मोकळा करुन देऊ. मुदतीनंतर पुढे वापरण्याकरिता लॉकर ठेवायचा असल्यास व त्यास आपली सहमती असल्यास या करारनाम्याची मुदत संपण्याआगोदर नियमाप्रमाणे आगाऊ भाडे /डिपॉझिट देऊ. तसे न झालेस त्या नियमाप्रमाणे आमचेवर पडणाऱ्या जबाबदारीस आम्ही जबाबदार व पात्र राहू.

४) भाडे कराराची मुदत संपण्यापुर्वी आम्हापैकी कोणीही मयत झाल्यास आम्ही दिलेल्या वारस नोंदणीनुसार व अधिकार दिलेल्या व्यक्ती लॉकर संबंधी व्यवहार करणेस जबाबदार राहतील.

५) आम्ही ठरविलेला सांकेतिक शब्द आपणास कळविला आहे सांकेतिक शब्द आमचे गौप्य म्हणून पाळू कदाचित आमचे हातून काही चूक झालेस जे नुकसान होईल त्याची जबाबदारी आमचेवर आहे.

६) सेफची एक किल्ली आपलेजवळ असून दुसरी आपण आम्हास दिली ती आम्ही जतन करु व हरविल्यास आपणास ताबडतोब कळवू. किल्ली आमचेकडून हरविल्यास किंवा आमच्या दुसऱ्या कोणत्याही कृत्याने बँकेच्या इमारतीचे, सेफ वगैरेचे अगर दुसरे कोणतेही नुकसान झालेस ते आम्ही बिनतक्रार भरुन देऊ.

७) कारणापरत्वे आम्हास स्वत: येऊन सेफ उघडणेस शक्य न झाले तर अशा वेळी सेफ उघडण्याचा अधिकार आमच्या तर्फे ज्या कोणा इसमास दिला आहे. यासोबत त्याचे नांव त्याच्या सहीचा नमुना आम्ही स्वत: बँकेत स्वतंत्रपणे दाखल करीत आहोत एकदा दिलेला वटमुखत्यार काढून टाकावयाचा झाल्यास किंवा त्याचे ऐवजी दुसरा वटमुखत्यार नेमावयाचा झाल्यास तशी लेखी नोटीस आम्ही बँकेत अगाऊ देऊ तत्पुर्वी बँकेच्या दप्तरी दाखल असलेल्या वटमुखत्याराने जरुर वाटल्यास आम्ही आपला खुणेचा शब्द बदलून घेऊ व तसा तो बँकेने आम्हास बदलून द्यावा आम्ही दिलेल्या मुखत्याराच्या कोणत्याही कृत्याची जबाबदारी बँकेच्या भाडेकरु या नात्याने सर्वस्वी आमचेवर आहे. व त्यांचेकडून बँकेचे जे नुकसान होईल ते आम्ही बँकेस भरुन देऊ.

८) आम्हास वापरण्यास दिलेली सेफ आम्ही मुदतीत मोकळी करुन न दिल्यास सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील सेफ भाड्याने देण्याबाबतच्या नियमान्वये तजबीज करुन आपण आमचे खर्चाने व जबाबदारीवर सेफ मोकळी करुन घ्यावी.

९) आमच्या कोणत्याही कृत्यामुळे बँकेचे जे नुकसान होईल त्याचा बोजा सेफमध्ये असलेल्या जिंन्नसावर असल्याचे आम्हास कबूल आहे. आम्ही अगर आमच्याकरिता अधिकृत इसमानी अगर वालीवारस वगैरेनी बँकेचे आमचेकडे जे येणे होईल. ते न दिले तर सदरचे जिन्नस बँकेने नियमाप्रमाणे विकून वसूल करुन घ्यावे व कमी आल्यास ते पुरे करण्यास आम्ही जातीने बांधून घेत आहोत, आमच्या पश्चात आमचे इतर इस्टेट वारसदार जबाबदार असतील

१०) हा करारनामा व सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील सेफ भाड्याने देण्याबद्दलचे बँकेचे सर्व नियम व या दोहीमुळे उत्पन्न होणारे आपणा उभयतांचे अंतर्गत परस्पर संबंध व आमच्यावर येत असलेल्या जबाबदाऱ्या व बंधने यांस आम्ही जिम्मेदार आहोत व आमचे पश्चात आमचे वेळोवेळी नेमून दिलेले अधिकृत इसम, वालीवारस, एक्झीक्यूटर ॲडमिनिस्ट्रेटर वगैरे सर्व हे ही त्यास आमच्याप्रमाणे जिम्मेदार आहोत. लॉकर भाड्याने देण्याबाबतचे नियम अटी शर्ती वाचल्या असून व त्यामध्ये बँकेने वेळोवेळी केलेले बदल आम्हांस मान्य व कबूल आहेत. येणेप्रमाणे हा करारनामा आम्ही आपल्या राजीखुशीने व अक्कल हुशारीने लिहून दिला असून त्यावर आज दि. / / रोजी आम्ही आपली सही केली आहे.

**लॉकरधारक सही १) २)**

**क्लार्क ज्यु. ऑफिसर / शाखाअधिकारी मुख्यकार्यकारी अधिकारी**

## ❊ लॉकरसंबंधी नियम व अटी ❊

१) लॉकर मागणीसंबंधी अर्ज बँकेच्या अधिकृत फॉर्म वर करावा. अर्ज मंजूर झालेवर व ह्या संबंधातील करारपत्रावर अर्जदाराने सही केलेनंतर व लॉकर कि सेक्युरिटी डिपॉझिट बँकेत भरल्यानंतर अर्जदारास लॉकर वापरणेस दिला जाईल. डिपॉझिटवर कोणत्याही प्रकारे कर्ज घेता येणार नाही. कोणतेही कारण न देता लॉकर नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे. एकापेक्षा अनेकांनी एकत्रीत लॉकर ची मागणी केल्यास सर्वांनी अर्जावर व त्यासंबंधीच्या करारपत्रावर सह्या केल्या पाहिजेत. नोंदणी केलेल्या संस्थेबाबत करार पत्रावर सह्या केल्या पाहिजेत. अधिकार दिलेबाबतचे पत्र बँकेकडे लॉकर अर्जासोबत दिले पाहिजे. दिलेल्या अधिकारात संस्थेने अधिकार दिलेली व्यक्ती/ अधिकारी यांनी अर्ज व तसा बदल बँकेकडे लेखी कळवेपर्यंत पूर्वी दिलेले अधिकाराप्रमाणे जातील. बदल अधिकाराप्रमाणे बँकेकडे केलेले व्यवहार कायदेशीर व योग्य समजले जातील. बदल न कळविलेमुळे नुकसानी झालेस त्यास बँक जबाबदार राहणार नाही.

२) बँकेच्या कार्यालयीन कामकाज वेळेतच लॉकर उघडता येईल. त्यामध्ये बदल करणेचा अधिकार बँकेस राहील.

३) लॉकरधारकाने लॉकर उघडणे अगर त्याचा वापर वर्षातून किमान एकवेळेस तरी केला पाहिजे. अधिकार न दिलेल्या व्यक्तीस लॉकर उघडता येणार नाही.

४) बँक व लॉकर धारक यांच्यातील संबंध हे लॉकर मालक (Lessor) व लॉकर भाडेकरू (Lessee) असे असतील, बँक व ग्राहक (Customer) असे असणार नाहीत.

५) लॉकर उघडणेचा अधिकार – १) व्यक्तीगत २) दोघापैकी कोणीही एकास अगर जो हयात असेल त्यास ३) संयुक्तीक असलेल्या कोणाही एकास किंवा हयात असतील त्यापैकी कोणाही एकास किंवा जो शेवटचा असेल ४) संयुक्तीक खाते असलेस संयुक्तपणे राहील.

६) लॉकर धारकाच्या पश्चात लॉकर उघडणेचा अधिकार – १) नेमलेल्या वारसास २) जो हयात असेल त्यास ३) संयुक्तीक खाते असलेस हयात असेल तो व नेमलेला वारस यांच्या संयुक्त सहीने / संम्मतीने राहील. लॉकर धारकाच्या मृत्यू पश्चात त्याचे मृत्यू प्रमाणपत्र व वगैरे कायदेशीर बाबींची पुर्तता करणे आवश्यक राहील.

७) बँकेला आवश्यक वाटल्यास बँक लॉकरधारकाला आगाऊ नोटीस देऊन लॉकर रिकामा करणेस सांगेल. अशाप्रकारे लॉकर रिकामे न केलेस बँक सदर लॉकर रिकामा करून घेईल व यातील जिन्नस बँकेत इतरत्र लॉकरधारकाचे जबाबदारीवर ठेवणेत येतील.

८) लॉकर धारकास कराराची मुदत संपणेपूर्वी लॉकर पुढे नको असल्यास तसे बँकेत लेखी कळवून त्यावेळी लॉकरची किल्ली बँकेकडे परत द्यावी लागेल. बँकेच्या मंजूरीनंतर लॉकर परत बँकेस देता येईल.

९) लॉकर मोकळा करून व मागणीचा हक्क राखून ठेवून लॉकर व्यवहार पुढील वर्षासाठी चालू ठेवण्यास बँक परवानगी देईल.

१०) लॉकर धारक खातेदारास लॉकर किंवा त्याचा भाग पोटभाड्याने देता येणार नाही. तसेच लॉकरचा उपयोग मुल्यवान वस्तु/ कागदपत्रे ठेवणेसाठी करता येईल. लॉकरचा वापर स्फोटके, संहारक विनाशकारी, वस्तू बंदिस्त किंवा बेकायदेशीर स्वरुपातील वस्तू किंवा अनारोग्य निर्माण करणाऱ्या वस्तु ठेवण्यासाठी करता येणार नाही.

११) लॉकर संबंधीच्या नियमांचा भंग केल्यास त्यासाठी नोटीस देऊन पंचनामा करून बँक लॉकर उघडून (Break Open) लॉकर मोकळा करून घेईल व लॉकरमधील वस्तु इन्शु. रजि. पोस्टाने लॉकर खातेदाराचे खर्चाने व जबाबदारीवर पाठवील किंवा बँकेच्या सोयीप्रमाणे बँक सदर जिन्नस वेगळ्या लॉकर किंवा अन्य ठिकाणी ठेऊन योग्य तो चार्ज अशा वस्तु सांभाळणेबद्दल घेईल. लॉकर उघडणेचा व त्यास नवीन कुलुप करून घेणेचा खर्च खातेदारास द्यावा लागेल.

१२) बँकेने सर्टि. ऑफ पोस्टींग (टपाल टाकलेबद्दलचा पोस्टचा दाखला घेऊन) ने पाठविलेली नोटीस खातेदाराने दिले पत्त्यावर पाठविली म्हणजे योग्य प्रकारे नोटीस दिली असे समजणेचे आहे. खातेदाराने आपल्या पत्त्यात बदल झाल्यास तो बँकेस न चुकता कळविला पाहिजे.

१३) लॉकर धारकाने नवीन कुलुप करणे अगर किल्ली हरवलेस बँकेस लेखी कळविले नसल्यास होणाऱ्या नुकसानीस बँक जबाबदार नाही. लॉकर उघडणे व नवीन कुलुप बसविणेचा खर्च लॉकर धारकास द्यावा लागेल. जो खर्च येईल तो न दिल्यास लॉकरचा वापर करू दिला जाणार नाही. अशा खर्च येण्यापोटी जनरल लोन पीन लॉकर मधील जिन्नस किंवा वस्तु, खर्चाची रक्कम जमा होईपर्यंत आपल्या ताब्यात लॉकर धारकाच्या जबाबदारीवर ठेवील. त्याकरिता लॉकर साठी ठेवलली ठेव परत केली जाणार नाही. याबाबत बँकेस अधिकार राहील.

१४) लॉकर दुरूस्ती , लॉकर मोडून उघडणे किंवा नवीन कुलुप बसविणे या गोष्टी बँकेने नेमलेल्या अधिकृत व्यक्तीमार्फत केल्या जातील.

१५) लॉकर धारकास बँकेचे नियमाचे, लॉकर संबंधी असणाऱ्या कि डिपॉझिट रक्कमेत वेळोवेळी संचालक मंडळाने बदल केल्यास त्या नियमांचे बंधन राहिल. या नियमास कोणत्याही प्रकारे बाधा लॉकर धारकाकडून झाल्यास लॉकर वरील व्यवहार बँकेस थांबवता येतील.

१६) बँकेकडे लॉकरधारकाने नोंदवलेल्या पत्तावर बँकेने केलेला पत्रव्यवहार योग्यप्रकारे लागू केला असे समजण्यात येईल.

१७) जर दंगा, संप अगर काही विशिष्ट धोकाच्या वेळी लॉकर धारकास कोणतेही आगाऊ सुचना न देता लॉकर व्यवहार बंद ठेवणेचा अधिकार बँकेस राहील.

१८) सदर नियमात बदल करणे, कमी करणे, वाढविणे, शब्दात बदल करणे व लॉकर मागणी नुतनीकरण अर्ज मंजूर अथवा कोणतेही कारण न देता राहील नामंजूर करणेचा अधिकार बँकेस राहील.

वरील नियम मी/आम्ही वाचले असून ते मला/आम्हांला मान्य आहेत.

लॉकर घेणाऱ्याची सही १)........................ २)........................